## -: प्रेसनोट दिनांक - ११/१२/२०२४ :-

**आरोपी लोकसेवक १) सचिन बाळकृष्ण मोरे, वय - ४४ वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - ३ (ग्रामविकास अधिकारी), परखंदळे व बांबवडे, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर २) प्रथमेश रविंद्र डंबे, वय -२२ वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - ३ (ग्रामविकास अधिकारी), साळशी - पिशवी, ता. शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. नवे पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून स्विकारलेबाबत........**

---

यातील तक्रारदार यांची पत्नीचे माहेर बांबवडे, ता.शाहुवाडी हे आहे. तक्रारदार यांचे सासरे मयत झाले असुन त्यानंतर तक्रारदार यांचे सास-यांचे प्रॉप्रटीचे वारस म्हणुन तक्रारदार यांचे पत्नीसह पत्नीचे भाऊ,बहिण तसेच सावत्र आई असे वारसदार आहेत. तक्रारदार यांचे पत्नीने ग्रामपंचायत बांबवडे येथे ग्रामविकास अधिकारी यांचे' नावे त्यांचे वडीलांचा मृत्युचा दाखला व घरठाण उतारा मिळावा म्हणुन अर्ज केलेला होता. त्याकरीता तक्रारदार यांनी ग्रामपंचायत अधिकारी सचिन मोरे यांची भेट घेतली त्यावेळी मोरे यांनी तक्रारदार यांना त्यांचे सास-यांचा मृत्युचा दाखला व घरठाण उतारा देतो पण त्यासाठी ५,०००/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांना कायतर कमी करा म्हणुन विनंती केली पण त्यानी तक्रारदार यांचे काही न ऐकता ५०००/- रूपये दिले तरच दाखला व उतारा मिळेल असे म्हणुन तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केली होती. त्यानंतर तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर येथे तक्रार दिलेली होती.

तक्रारदार यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये तक्रारदार यांचेकडे ग्रामविकास अधिकारी मोरे यांनी प्रथम २०,०००/- रूपयांची मागणी करून तडजोडीअंती ५,०००/- रूपयांची लाच मागणी केलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर सापळा कारवाई आयोजीत केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष ग्रामविकास अधिकारी मोरे यांचे सांगणेवरून प्रथमेश डंबे, ग्रामविकास अधिकारी साळशी पिशवी यांनी तक्रारदार यांचेकडुन ५,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारलेने दोघांना रंगेहाथ पकडणेत आले.

सदरबाबत आरोपी लोकसेवक १) सचिन बाळकृष्ण मोरे, वय - ४४ वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - ३ (ग्रामविकास अधिकारी), परखंदळे व बांबवडे, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर २) प्रथमेश रविंद्र डंबे, वय -२२ वर्षे, पद - ग्रामपंचायत अधिकारी, वर्ग - ३ (ग्रामविकास अधिकारी), साळशी - पिशवी, ता.शाहुवाडी,जि.कोल्हापूर रा. जुने पारगाव, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर यांचेविरूध्द लक्ष्मीपूरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे. श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे तसेच वैष्णवी पाटील, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि. कोल्हापूर मार्गदर्शनानुसार आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, पो.हे.कॉ अजय चव्हाण, पो.ना. सुधिर पाटील, पो.कॉ. कृष्णा पाटील अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की,लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तकारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**

**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**

**३) श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील,पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९७६४१४०७७७. कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**

**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४. ५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**